महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

क्रमांक :- १७३८८/ मराठी भाषा समिती (ड-१७)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक :- १२ ऑक्टोबर,२०२६.

संदर्भ : मराठी भाषा विभागाचे शासन परिपत्रक क्र. वाप्रेदि-२०२६/प्र.क्र.९८/भाषा-३, दि. १० सप्टेंबर,२०२६.

:: परिपत्रक ::

या सचिवालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना कळविण्यात येते की, माजी राष्ट्रपती स्व.डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने दिनांक १५ ऑक्टोबर हा त्यांचा जन्मदिवस "वाचन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. मराठी भाषा विभागाच्या संदर्भाधीन परिपत्रकान्वये वाचन प्रेरणा दिन साजरा करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत.

त्यानुषंगाने या सचिवालयात गुरुवार, दिनांक १५ ऑक्टोबर, २०२६ रोजी **"वाचन प्रेरणा दिन"** दुपारी ३.०० ते ४.०० या वेळेत कक्ष क्रमांक ८०१,आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे साजरा करण्याचे योजिले आहे.

सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांना महात्मा ज्योतीराव फुले यांच्या लेखन साहित्याबद्दल तसेच **स्वत: वाचलेल्या उत्कृष्ट मराठी साहित्याबद्दल किंवा अन्य भाषेतील असे साहित्य की ज्याचा मराठी भाषेत अनुवाद उपलब्ध आहे अशा साहित्याबद्दलची माहिती उपरोक्त दिवशी उपस्थितांसमोर सादर करता येईल.** अशा सादरीकरणासाठी इच्छुक अधिकारी/कर्मचारी यांनी स्वत:चे नाव, पदनाम व ते ज्या साहित्याबद्दलची माहिती सादर करु इच्छितात त्याची संक्षिप्त माहिती मराठी भाषा समिती कक्षास **सोमवार, दिनांक १२ ऑक्टोबर, २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** सादर करावी.

सदर कार्यक्रमातील सादरीकरणामध्ये **उत्कृष्ट व वाचनीय अशा साहित्याचा समावेश** होणे आणि सादरीकरणाच्या विषयामध्ये वैविध्य राखण्यासाठी इच्छुकांकडून प्राप्त झालेल्या साहित्याबद्दलच्या माहितीची छाननी करण्यात येईल. कार्यक्रमांतर्गत सादरीकरणासाठी उचित साहित्य निश्चित झाल्यानंतर सादरकर्त्यास त्याचे सादरीकरण उपस्थितांसमोर करता येईल.

कार्यक्रमामध्ये या सचिवालयाच्या **ग्रंथालय कक्षाकडून ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या वाचनीय व उत्कृष्ट मराठी ग्रंथसंपदेबाबतची माहिती देण्यात येईल.** तसेच या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांना वाचनाची प्रेरणा मिळण्यासाठी मार्गदर्शन देखिल करण्यात येणार आहे.

२/-

उक्त नमूद "वाचन प्रेरणा दिन" साजरा करणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य असल्याने या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी आपला सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी करावा.

जयम्हात्रे

(जयश्री म्हात्रे)
अवर सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति :

या सचिवालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी.

याची प्रत :

१. मा.सभापती,महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
२. मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
३. मा. सचिव-१, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय,विधान भवन,मुंबई.
४. मा. सचिव-२,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय, विधान भवन,मुंबई.
५. मा. सचिव-३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय, विधान भवन,मुंबई.
६. मा. सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय, विधान भवन,मुंबई.
७. मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
८. मुख्य प्रतिवेदक, ग्रंथालय कक्ष, कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक,ग-२ कक्ष, संगणक कक्ष, ध्वनीयंत्रणा चालक तथा यांत्रिकी कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
९. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.
१०. निवड नस्ती.